**महाराष्ट्र शासन**

क्रमांक : जमीन १०/२००७/प्र.क्र.३३/ज-१
महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : ६ जुलै, २००७.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.

विषय : शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा देणेबाबत.
संदर्भ : जमीन १०/२००६/प्र.क्र.८६/ज-१,
दिनांक २० ऑक्टोबर, २००६.

महोदय,

शासन निर्णय, क्रमांक जमीन १०/२००५/प्र.क्र.३८/ज-१, दि.७ मार्च, २००६ अन्वये शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा देण्याबाबतचे आदेश पारीत करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयातील परिच्छेद २(३) मध्ये निर्बाधरित्या वाटपास उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा राज्य शासन / केंद्र शासनाच्या विविध विभागांना / उपक्रमांना देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने आपणांस असे कळविण्यात येते की, सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून विविध लोकोपयोगी योजना राबविण्यात येतात. त्यापैकी ग्रामीण रुग्णालये / कुटीर रुग्णालये व शासकीय तंत्र प्रशिक्षण संस्था (आय. टी. आय.) इत्यादी शैक्षणिक प्रयोजनासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिला असल्यास व प्रकल्पासाठी प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असल्यास तसेच संबंधित विभागाने ठरविलेले निकष, मंजूर टाईप प्लॅन व जागेची खरीखुरी आवश्यकता (Bona-fide area requirement) विचारात घेऊन संबंधित विभागाकडून शासकीय जमिनीची मागणी करण्यात आल्यास आणि सदर जमीन निर्बाधरित्या वाटपास उपलब्ध असल्यास जिल्हाधिकारी यांनी शासन निर्णय क्र. जमीन १०/२००५/प्र.क्र.३८/ज-१, दि.७.३.२००६ मधील तरतुदीस अनुलक्षून आवश्यक त्या अटी व शर्तींवर जमिनीचा आगाऊ ताबा क्षेत्रिय सक्षम प्राधिकारी यांना नियमित अटी व शर्तीवर देण्याबाबतची कार्यवाही करावी. तसेच वित्तिय मर्यादेच्या अधीन राहून आवश्यकतेनुसार शासनाच्या मान्यतेसाठी स्वयंस्पष्ट प्रस्ताव सादर करावा, ही विनंती.

आपली,
(स्वाक्षरी)
(चा. दे. चौधरी)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग.

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
शाखा - 23/11
आवक नं. 32222
2 16 JUL 2007
विशेष नोंद वही नं.
विवरण नं.
17/7

प्र अनुज्ञेय राजेश सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी.
मि.उ.जि., जिल्हाधिकारी प्रत.